आपले सरकार सेवा केंद्र प्रकल्पांतर्गत केंद्र चालक, तालुका व्यवस्थापक आणि जिल्हा व्यवस्थापक यांनी करावयाच्या कामांबाबत.

# महाराष्ट्र शासन
## ग्राम विकास विभाग
**शासन परिपत्रक क्रमांकः आसक-२०१८/प्र.क्र.५३/आपले सरकार कक्ष**

बांधकाम भवन, मर्झबान पथ, फोर्ट,
मंत्रालय, मुंबई- ४०० ००१
तारीख :१५.डिसेंबर, २०२०.

वाचा :-

१) शासन निर्णय क्रमांकः- संग्राम-२०१५/प्र.क्र.९३/संग्राम कक्ष, दि.११ ऑगस्ट, २०१६

२) या विभागाचे समक्रमांकाचे दि.२८ फेब्रुवारी,२०१९ रोजीचे पत्र

## -: शासन परिपत्रक :-

दि ११ ऑगस्ट, २०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यात आपले सरकार सेवा केंद्र हा प्रकल्प राबविण्यात येत असून त्यानुसार राज्यातील ग्रामपंचायतीमध्ये आपले सरकार सेवा केंद्र स्थापन करण्यात आले आहेत. आपले सरकार केंद्र चालविण्याची जबाबदारी केंद्र शासन पुरस्कृत कंपनी CSC-SPV कडे सोपविण्यात आली आहे. आपले सरकार सेवा केंद्रामध्ये केंद्र चालकांची नियुक्ती CSC-SPV कंपनीकडून करण्यात आली आहे. केंद्र चालकांवर देखरेख व कामाचे नियोजन करण्याकरिता जिल्हा स्तरावर जिल्हा व्यवस्थापक आणि तालुका स्तरावर तालुका व्यवस्थापक यांची देखील नियुक्ती CSC-SPV कंपनीतर्फे करण्यात आलेली आहे. आपले सरकार सेवा केंद्र प्रकल्पाच्या माध्यमातून ग्रामपंचायतींच्या प्रशासनाचे संगणकीकरण करणे (G2G सेवा), ग्रामपंचायतीद्वारा देण्यात येणारे दाखले/प्रमाणपत्र संगणकीकृत करणे व वितरीत करणे (G2C सेवा), ग्रामपंचायतीशी संबंधित नसलेल्या व लोकांसाठी उपयोगी इतर सेवा संगणकीकरणामार्फत उपलब्ध करणे, उदा. रेल्वे-बस आरक्षण, वीज बिल भरणे, इत्यादी (B2C सेवा), इत्यादी सेवा देण्याचे काम ग्रामपंचायतीमध्ये केंद्र चालकांद्वारे करण्यात येते. तसेच आपले सरकार सेवा केंद्रांचे व्यवस्थापन करण्यासाठी जिल्हा व तालुका व्यवस्थापकांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

आपले सरकार सेवा केंद्रातील केंद्र चालकांनी प्रकल्पात विहीत केलेल्या सेवा देणे अभिप्रेत आहे. परंतु या केंद्र चालकांना आणि प्रकल्पामध्ये असलेले जिल्हा व्यवस्थापक आणि तालुका

व्यवस्थापक यांना प्रकल्पांच्या कामाव्यतिरिक्त इतरही बरेच कामे दिली जातात. त्यामुळे प्रकल्पांतर्गत अपेक्षित काम पुर्ण न झाल्याने प्रकल्पावर परिणाम होत आहे. यासंदर्भात केंद्र चालकांकडून वेळोवेळी शासनाकडे तक्रारी करण्यात येतात. वास्तविक सदर केंद्र चालक हे कंत्राटी कर्मचारी नसून स्वतंत्र उद्योजक (VLE) आहेत. त्यामुळे त्यांच्याकडून प्रकल्पाच्या कामाव्यतिरिक्त इतर प्रशासकीय कामे करुन घेणे उचित नाही. इतर कामांसाठी ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषद स्तरावर इतर कर्मचारी उपलब्ध आहेत. यासंदर्भात वारंवार सूचना देऊनही केंद्र चालक, जिल्हा व्यवस्थापक आणि तालुका व्यवस्थापक यांचेकडून इतर कामे करुन घेण्यात येतात. निवडणूकीच्या कामाची जबाबदारी देखील त्यांच्यावर सोपविण्यात येत असल्याचे निदर्शनास आले. सबब, आपले सरकार सेवा केंद्र प्रकल्पाचे कामकाज पूर्ण क्षमतेने चालविण्यासाठी जिल्हा व्यवस्थापक, तालुका व्यवस्थापक आणि केंद्र चालकांच्या कामांची व्याप्ती खालीलप्रमाणे निश्चित करण्यात येत आहे.

(अ) **केंद्र चालकांची कर्तव्ये :-**

G२G

१) ग्रामपंचायतींच्या लेखा संहिता २०११ मधील दैनंदिन कामकाजाचे १ ते ३३ नमूने Egram सॉफ्टमध्ये संगणकीकृत करणे.

२) ई पंचायत कार्यक्रमांतर्गत EgramSwaraj आज्ञावली (११ NIC Application) मध्ये माहिती अद्यावत करणे.

३) जिल्हा परिषद तसेच पंचायत समिती स्तरावरील आपले सरकार सेवा केंद्र प्रकल्पाबाबत आयोजीत बैठक/प्रशिक्षणास उपस्थित राहून ग्रामसेवक व सरपंच/ उपसरपंच यांना अवगत करणे

G२C

१) ग्रामपंचायतीद्वारे देण्यात येणारे १ ते १९ दाखले/प्रमाणपत्र (G२C) संगणकीकृत करणे व वितरीत करणे.

२) आपले सरकार पोर्टलद्वारे ग्रामपंचायत स्तरावर देण्यात येणाऱ्या सेवा व दाखले संगणकीकृत करणे व वितरीत करणे.

३) राईट टू सर्व्हिसेस ॲक्ट अंतर्गत येणा-या सेवा ग्रामपंचायत स्तरावर वितरीत करणे.

४) केंद्र चालक हा स्वतंत्र उद्योजक असल्याकारणाने अर्थार्जनाकरिता इतर व्यावसायिक सुविधा ग्रामविकास विभागाने पूर्व परवानगी दिलेली अथवा त्यांच्याकडून पूर्व परवानगी घेऊन इतर विभागाने दिलेली कामे .

B२C

१) ग्रामपंचायतींशी संबंधित नसलेल्या व लोकांसाठी उपयोगी इतर सेवा (B२C) संगणकीकरणामार्फत उपलब्ध करणे. उदा. रेल्वे-बस आरक्षण , मोबाईल/डिटीएच रिचार्ज,वीज बिल भरणे, आधार कार्ड/पॅनकार्ड/पासपोर्ट नोंदणी इत्यादी.

FI

१) ग्रामपंचायत स्तरावर बँकिंग सेवा वितरीत करणे.
२) विमा हप्ते भरणे/विमा वितरीत करणे इत्यादी.

(ब) तालुका व्यवस्थापकाची कर्तव्ये :-

१) केंद्र चालक नियुक्ती व इतर अनुशांगिक कामे ( CSC ID, Bank details, etc.)
२) ग्रामसेवक, केंद्र चालक व सरपंच/उपसरपंच यांना प्रणाली संबंधित प्रशिक्षण देणे.
३) केंद्र चालकांच्या दैनंदिन कामकाजाची देखरेख ठेवणे.
४) ग्रामपंचायतीस भेट देऊन संगणकीकरणाकरीता आवश्यक पायाभूत सुविधांचे निरीक्षण करणे व अहवाल देणे.
५) केंद्र चालकांस आवश्यक असे तांत्रिक सहाय्य करणे व प्रणाली संबंधित समस्यांचे निराकरण करणे.
६) गटविकास अधिकारी यांचेशी समन्वय ठेऊन त्यांना वेळोवेळी आपले सरकार प्रकल्पाबाबत अद्यावत माहिती देणे .
७) ग्रामसेवक, केंद्र चालक व सरपंच/ उपसरपंच यांची आपले सरकार प्रकल्पाबाबत बैठक/ प्रशिक्षण पंचायत समिती स्तरावर आयोजित करणे.
८) पंचायत समिती कार्यालयात सोमवार व गुरूवारी उपस्थितीत राहून (सार्वजनिक सुट्टी असल्यास लगतच्या कामकाजाच्या दिवशी) इतर दिवशी क्षेत्रभेट देणे.

(क) जिल्हा व्यवस्थापकाची कर्तव्ये :-

१) केंद्र चालक नियुक्ती व इतर अनुशांगिक कामे ( CSC ID, Bank details, etc.)
२) तालुका व्यवस्थापक, ग्रामसेवक, केंद्र चालक व सरपंच/उपसरपंच यांचे प्रणाली संबधित प्रशिक्षण.
३) केंद्र चालक व तालुका व्यवस्थापक यांच्या दैनंदिन कामाकाजाची देखरेख ठेवणे.

४) ग्रामपंचायतीस भेट देऊन संगणकीकरणा करिता आवशक पायाभूत सुविधांचे निरीक्षण करणे व अहवाल देणे.

५) केंद्र चालकांस आवश्यक असे तांत्रिक सहाय्य करणे व प्रणाली संबंधित समस्यांचे निराकरण करणे .

६) जिल्हा परिषद स्तरावर मुख्य कार्यकारी अधिकारी व उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) यांचेशी समन्वय ठेऊन त्यांना वेळोवेळी आपले सरकार प्रकल्पाबाबत अद्यावत माहिती देणे.

७) जिल्हा परिषद स्तरावर मुख्य कार्यकारी अधिकारी व उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) यांना आपले सरकार प्रकल्पाबाबत साप्ताहिक व मासिक अहवाल देणे.

८) तालुका व्यवस्थापक, ग्रामसेवक, केंद्र चालक व सरपंच/उपसरपंच यांची आपले सरकार प्रकल्पाबाबत बैठक/प्रशिक्षण जिल्हा परिषद स्तरावर आयोजित करणे.

९) जिल्हा परिषद मुख्यालय येथे सोमवार व गुरूवारी उपस्थितीत राहून (सार्वजनिक सुट्टी असल्यास लगतच्या कामकाजाच्या दिवशी) इतर दिवशी क्षेत्रभेट देणे.

उपरोक्त कामाव्यतिरिक्त इतर कामे द्यावयाची झाल्यास त्यास शासनाची पूर्व मान्यता अवाश्यक राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(प्रविण देविचंद जैन)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. सर्व विभागीय आयुक्त,
२. सर्व जिल्हाधिकारी,
३. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.
४. सर्व जिल्हा परिषदांचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी, (पंचायत/सा.प्र.वि).
५. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी.

६. सर्व पंचायत समितींचे गट विकास अधिकारी.
७. सर्व ग्रामपंचायतींचे ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी.
८. सीएससी-एसपीव्ही ई-गव्हर्नन्स इंडिया लिमिटेड, इलेक्ट्रॉनिक निकेतन, तिसरा मजला, DeITY, ६ सीजीओकॉम्प्लेक्स, लोधी रोड, नवी दिल्ली-११०००३.

त्यांना कळविण्यात येते की, सदर परिपत्राकची प्रत त्यांच्या अधिनस्त सर्व केंद्र चालक व इतर कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणून द्यावी.

९. निवड नस्ती, आपले सरकार कक्ष, ग्रामविकास विभाग.

प्रत माहितीसाठी

१. अतिरिक्त मुख्य सचिव, ग्रामविकास विभाग
२. उप सचिव, ग्रामविकास विभाग